| शालेय पोषण आहार योजना डाटा एंट्री ऑपरेटर पदभरती २०१६ बाबत हरकती स्वरुप व त्याबाबत अभिप्राय | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | हरकती घेणा-या उमेदवाराचे नांव | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
| १ | सिमा पांडुरंग घोरतळे मु.पो. नेवासा (कडू गल्ली) ता. नेवासा जि. अहमदनगर | मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसाठी मला मोबाईल मेसेज व ई-मेल व्दारे कोणताही मेसेज आलेला नाही. माझे शिक्षण एम.कॉम झालेले आहे. मी ऑनलाईन अर्ज भरताना पदवीपर्यंतेच शिक्षण भरलेले होते. तथापि सदरच्या पदवीचा सहानभुती पूर्वक विचार करुन मला माझ्या कागदपत्रांची पडताळणी करुन मला पद्वीचे १० मार्क देण्यात यावेत. तसेच मूळ कागदपत्रांची पडताळणीसाठी मला मेसेज आलेला नसून पात्र व अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्याचा मेसेज आला आहे. त्या यादीमध्ये देखिल माझे पात्र/अपात्र दोन्ही यादीमध्ये नाव आलेले नाही. | उमेदवार खुल्या प्रवर्गातील आहे. जाहिरातीनुसार खुल्या प्रवर्गाकरीता ६ पदे रिक्त आहेत. शासन निर्णय दि.१०/२/२०१० अन्वये १:५ या प्रमाणात खुल्या प्रवर्गाकरीता ६ रिक्त पदांसाठी गुणानुक्रमे यादीतील पहिले १ ते ३० उमेदवारांना मूळ कागदपत्र पडताळणी करणेकरीता बोलविण्यात आलेले आहे. सिमा घोरतळे यांचा गुणानुक्रमे यादीत १०९ अ.क्र.असल्याने व त्यांच्या गुणानुक्रमांका पर्यंत १:५ या प्रमाणात बोलविण्यात आलेल्या उमेदवारांची संख्या पोहचत नसल्याने त्यांना मे.चाणक्य सॉप्टेवअर, पुणे यांचेमार्फत मेसेज पाठवून बोलविण्यात आले नाही. त्यामुळे सदर उमेदवाराचा पात्र/अपात्र यादीमध्ये नाव नाही. सबब, सदर हरकत निकाली काढण्यात येत आहे |
| २ | अक्षय भागनाथ ससाणे | दि.२६/७/१६ रोजी वेबसाईटवर प्रसिध्द झालेल्या पात्र व अपात्र यादीमध्ये नाव ३३ नं.आहे. कागदपत्र पडताळणी दोन फॉर्मसाठी एकच मोबाईल क्र. वापरल्यामुळे **मला कागदपत्र पडताळणीचा मेसेज समजला नाही.** माझे कागदपत्र पडताळणी व्हावी ही आपणास हरकत सादर करीत आहे. | मे.चाणक्य सॉप्टेवअर, पुणे यांचेमार्फत अक्षय भागनाथ ससाणे या उमेदवारास मूळ कागदपत्र पडताळणी करीता दि.२३/७/२०१६ रोजी या कार्यालयात उपस्थित राहणेकरीता दि.२२/७/२०१६ रोजी अर्जात नमूद केलेल्या दूरध्वनी क्रमांकावर मेसेज पाठविणेत आलेला आहे. परंतु सदर उमेदवार दि.२३/७/२०१६ रोजी मूळ कागदपत्र पडताळणी करीता उपस्थित राहीलेला नाही. सदर उमेदवार गैरहजर असल्यामुळे दि.२६/७/१६ रोजी प्रसिध्द करणेत आलेल्या यादीमध्ये अपात्र आहे. कागदपत्र पडताळणी दोन फॉर्मसाठी एकच मोबाईल क्रमांक वापरल्यामुळे मला कागदपत्र पडताळणीचा समजला नाही असे उमेदवाराने हरकत पत्रात नमूद केले आहे. सबब, सदर हरकत निकाली काढण्यात येत आहे. |
| ३ | कु-हे ज्ञानेश्वरी नामदेव | जिल्हा परिषद अहमदनगर शिक्षण विभाग (प्राथ.), शालेय पोषण आहार या विभागामध्ये डेटा एन्ट्री ऑपरेटर या पदासाठी अर्ज केला आहे. मी त्या पदासाठी शैक्षणिक पात्र आहे. परंतु माझे कागदपत्र पडताळणी झाली असून, मी नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र २ दिवसांनी जमा केले असून अंतिम यादी मध्ये माझे नाव अपात्र असे आले आहे. | डाटा एंट्री ऑपरेटर पदभरती जाहीरातीनुसार ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात दि.२३.६.२०१६ व ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि.३०.६.२०१६ अशी होती. सदर उमेदवाराने दि.१५/७/२०१६ (जाहिरातीच्या अंतिम दिनांकानंतर) रोजी नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र मिळविणेकरीता अर्ज केला आहे. तसेच सदर उमेदवाराचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र दि.२२/७/२०१६ असा आहे. सबब, उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि.३०.६.२०१६ अखेर नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र मिळविणेकरीता अर्ज केलेला नसल्यामुळे अपात्र आहे. सबब, सदर हरकत निकाली काढण्यात येत आहे. |

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर
30/7/16